MHSO140026932023

दाखल तारीखः– २७/०९/२०२३
नोंद तारीखः– २७/०९/२०२३
निकाल तारीखः– १६/०३/२०२६
कालावधीः– ०२ वर्षे ०५ महिने १९ दिवस

| | | |
|---|---|---|
| | **मे. जी. एस. पाटील यांचे न्यायालयात**<br>**सध्या – प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता.बार्शी, जि. सोलापूर**<br>**(न्यायनिर्णय दिनांक १६ मार्च, २०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्र.५४४/२०२३) नि.क्र.४४** | |
| | (एफ.आय.आर/गुन्हा नं.४८७/२०२३ बार्शी शहर पोलिस स्टेशन) | |
| तक्रारदार / अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>बार्शी शहर पोलीस ठाणे, ता. बार्शी,<br>जि. सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी. काजळे. |
| आरोपी | | **इब्राहीम राजअहमद शेख,**<br>वय – ३९ वर्षे, धंदा– मजुरी,<br>रा.मंगळवार पेठ, ता.बार्शी, जि.सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | विधिज्ञ श्रीमती. ए. आय. शेख |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १०/०६/२०२३ |
| एफ.आय.आर तारीख | १०/०६/२०२३ |
| दोषारोपपत्र तारीख | २७/०९/२०२३ |
| दोषारोप तारीख | १७/०४/२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरुवात तारीख | ११/११/२०२५ |
| निकाल राखुन ठेवला ती तारिख | निरंक |
| निकालाची तारिख | १६/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

**आरोपी तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामिनावर सुटकेची तारिख | दोषारोप | जर निर्दोष अथवा दोषी असेल तर | शिक्षा ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ चे उद्देशाने खटल्या दरम्यान कोठडी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | इब्राहीम राजअहमद शेख | १२/०७/२३ | १२/०७/२३ | भा.द.वि.कलम ३८४ | निर्दोष | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा. १ | रियाज अब्बास पठाण (नि.क्र.१६) | फिर्यादी |
| अ.सा. २ | जुबेर रमजान पठाण (नि.क्र.२०) | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अ.सा. ३ | सुरज चॉद मुल्ला (नि.क्र.२२) | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अ.सा. ४ | अदनान अन्वर पठाण (नि.क्र.२६) | निवेदन व जप्ती पंच साक्षीदार |
| अ.सा. ५ | नईम जहांगीर पठाण (नि.क्र.३०) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा. ६ | ऋषीकेश सुनिल साठे (नि.क्र.३१) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा. ७ | करन सुरेश मोरे (नि.क्र.३५) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा. ८ | मनोजकुमार पाषाण भोसले (नि.क्र.३६) | तपासीक अधिकारी |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः  नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः नाही.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ.क्र. | निशाणी  क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १) | निशाणी क्र.१४ | तडजोड पुरसिस |
| २) | निशाणी क्र.१७ | फिर्याद |
| ३) | निशाणी क्र.३७ | घटनास्थळ पंचनामा. |
| ४) | निशाणी क्र.३८ | आरोपीचे निवेदन पंचनामा व जप्ती पंचनमा. |

**ब.   बचावपक्ष  :  तपासले नाही.**

**क.   न्यायालयीन निशाणीः नाही.**

**ड. मुद्देमाल क्रमांक : आहे.**

| अ.क्र. | मुद्देमाल वर्णन | मुद्देमाल क्रमांक |
|---|---|---|
| | रोख रक्कम ४०००/- त्यात ५००/- रु दाराच्या चलनी एकूण ०८ नोटा असून त्यांचे नंबर 1) 4PD468161, 2) 8RQ801812, 3) 7NN249275, 4) 2MR676540, 5) 9BP373342, 6) 7KV545784, 7) 0AW009731 आणि 8) 0EW093066 | २१२/२०२३ |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १६ मार्च, २०२६)

१.	प्रस्तुत प्रकरणातील आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३८४ अन्वये दंडनीय अपराध केल्याच्या आरोपाखाली फौजदारी खटला चालविण्यात आला.

२. **<u>अभियोग पक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे अशी आहे की,</u>**

प्रस्तुत प्रकरणामध्ये रियाज आब्बास पठाण रा. नाळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर हे फिर्यादी आहेत. ते कुटूंबासह एकत्रात राहणेस असून व्यवसाय करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात. दिनांक १०/०६/२०२३ रोजी रात्री १२.३० वाजता ते ०१.०० वाजताचे दरम्यान आरोपी इब्राहिम राजअहमद शेख याने फिर्यादीस पोष्ट चौकातील इंडियन बेकरी अॅन्ड डेअरीमध्ये भेसळ चालते तुझी अन्न भेसळ सोलापूर यांचेकडे तक्रार करतो. मी पत्रकार व आरटीआय पदाधिकारी आहे. मला सर्व अधिकारी घाबरतात तुझी बेकरी बंद पाडायची नसेल तर तु मला आता १०,०००/- रुपये खंडणी दे नाही तर तुझी बेकरी बंद पडली म्हणून समज अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांनी घाबरुन त्याचे जवळील ५०००/- रुपये आरोपीस दिले व उर्वरीत पैशासाठी आरोपीने फिर्यादीच्या घरी येवून पैसे दिले नाहीतर तुझ्या बेकरीचे फोटो पेपरमध्ये व फेसबुकवर टाकून बेकरी बंद करतो अशी धमकी दिली. म्हणून फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द तक्रार दिली.

३. सदर फिर्यादच्या आधारे बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ३८४ प्रमाणे गुन्हा रजिस्टर नं. ४८७/२०२३ दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहेकॉ श्री एम. पी. भोसले, बार्शी शहर पोलीस स्टेशन यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३८४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर नि.क्र.०४ नुसार आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३८४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपीस ते वाचून दाखविले असता आरोपीने (नि.क्र. ०५) प्रमाणे गुन्हा नाकबूल करुन प्रकरणाची संपरिक्षा करावी अशी विनंती केली.

५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी कथनान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी यांचेविरुध्द पुरावा आढळून आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या बचावामध्ये असे कथन केले आहे की, तो सामाजिक कार्यकर्ता आहे, पोलीस जे बेकायदेशीर कामे करतात त्याचा तो पाठपुरावा करतो, पोलीसांना ते मान्य नसल्यामुळे पोलीसांनी त्याच्यावरती

खोटा गुन्हा दाखल केला आहे.

६. प्रस्तूत प्रकरणातील वस्तूस्थितीवरुन माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणासहीत पुढीलप्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक १०/०६/२०२३ रोजी रात्री १२.३० ते ०१.०० वाजताचे दरम्यान बिडवे ट्रॅव्हल्सच्या अलीकडे, बार्शी, ता. बार्शी येथे आरोपी याने फिर्यादीस "इंडियन बेकरी अॅन्ड डेअरीमध्ये भेसळ चालते तुझी अन्न भेसळ व इतर विभाग यांचेकडे तक्रार अर्ज व तक्रारी मेल करतो. मी पत्रकार व आरटीआय पदाधिकारी आहे. मला सर्व अधिकारी घाबरतात तुझी बेकरी बंद पाडायची नसेल तर तु मला आता १०,०००/– रुपये खंडणी दे नाही तर तुझी बेकरी बंद पडली म्हणून समज" अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांनी घाबरुन त्याचे जवळील ५०००/– रुपये आरोपीस दिले व उर्वरीत पैशासाठी आरोपीने फिर्यादीच्या घरी येवून पैसे दिले नाहीतर तुझ्या बेकरीचे फोटो पेपरमध्ये व फेसबुकवर टाकून बेकरी बंद करतो अशी धमकी दिली व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान संहिता मधील कलम ३८४ प्रमाणे गुन्हा केला? | नाही. |
| २) अंतिम आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, आरोपी याच्याविरुध्द तपासाअंती पुरावा गोळा होवून दोषारोपपत्र दाखल व तपासी अंमलदार यांच्या साक्षीपुराव्यानुसार आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होत असल्यामुळे आरोपीस भा.द.वि कलम ३८४ नुसार जास्तीत जास्त कडक शासन व्हावे, ही विनंती. आरोपीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, आरोपीविरुध्द सक्षम असा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपीविरुध्द खोटे दोषारोप दाखल केलेले आहे व खोट्या गुन्हात अडकवलेले आहेत.

त्यामुळे आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयाचा पलीकडे जावून शाबीत होत नाही. आरोपीने कोणताच गुन्हा केलेला नाही त्याच्यावर खोटी केस केलेली आहे. त्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावी, ही विनंती.

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ साठी

८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ रियाज अब्बास पठाण यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, ते इंडीयन बेकरी येथे कामाला आहे. सदर बेकरी पोस्ट चौकात आहे. सदरची बेकरी नईम पठाण चालवतात. दिनांक १०/०६/२०२३ रोजी काही झालेले नाही. आरोपी इब्राहिम राजअहमद शेख यास साक्षीदार ओळखतात आणि आरोपी साक्षीदाराचे नातेवाईक आहेत. दिनांक १०/०६/२०२३ रोजी काही घडले नव्हते. साक्षीदार पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले नव्हते. साक्षीदारास सही करण्यासाठी बोलावले होते. साक्षीदाराची को–या कागदावर सही घेतली होती. साक्षीदारास फिर्यादवरील सही (नि.क्र.१७) दाखवण्यात आली. त्यावर साक्षीदाराची सही आहे. फिर्यादमध्ये काय लिहिले आहे हे साक्षीदारास माहित नाही. आरोपी पत्रकार व आर.टी.आय पदाधिकारी आहे हे साक्षीदारास माहिती नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदारास उलटतपासादरम्यान उत्तर सूचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली आहेत. साक्षीदारास त्यांच्या फिर्यादमधील रेखांकित भाग–अ मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला असता त्यावर सही त्यांचीच असल्याचे कथन केले आहे. परंतु त्यातील मजकूर खरा व बरोबर नसल्याचे व पोलिसांनी तसे का लिहीले याबाबत त्यांना माहिती नसल्याचे अभियोग पक्षातर्फे उलटतपासादरम्यान कथन केले आहे. तसेच (नि.क्र.१४) वरील तडजोड पुरसिस पाहता,फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये आपसात तडजोड झाल्याचे स्पष्ट होत आहे.

९. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार क्र.२ जुबेर रमजान पठाण यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १०/०२/२०२३ रोजी साक्षीदारास पोलीसांनी कोठेही बोलावले नव्हते. साक्षीदाराने पोलीसांसोबत जावून पंचनामा

किंवा कारवाई केली नव्हती. साक्षीदारास पंचनाम्यावरील सही (नि.क्र.२१) दाखवण्यात आली. ती सही साक्षीदाराची आहे. त्यातील मजकुराबाबत साक्षीदारास माहिती नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान उत्तर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१०. अभियोग पक्षातर्फे दुसरे पंच साक्षीदार क्र.३ सुरज चॉद मुल्ला यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १०/०२/२०२३ रोजी साक्षीदारास पोलीसांनी शिवाजी चौक येथे बोलावले होते. तेथे पोलीसांनी साक्षीदाराकडून सही घेतली होती. पोलीसांनी तेथे साक्षीदारासमक्ष पंचनामा किंवा कारवाई केली नव्हती. साक्षीदारास पंचनाम्यावरील सही नि.क्र. २३ दाखवण्यात आली. ती साक्षीदाराची आहे. त्यातील मजकूराबाबत साक्षीदारास माहिती नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदारास उलटतपासादरम्यान उत्तर सूचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

११. अभियोग पक्षातर्फे निवेदन पंच साक्षीदार क्र.४ अदनान अन्वर पठाण यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १२/०७/२०२३ रोजी बार्शी शहर पोलीसांनी साक्षीदारास बोलाविले नव्हते. साक्षीदारासमक्ष काहीही झाले नव्हते. निवेदन पंचनाम्यावरील सही नि.क्र. २७ वरील सही साक्षीदाराची आहे. साक्षीदार व पोलीस कोठे गेले होते असे काही घडले नाही. जप्ती पंचनाम्यावरील नि.क्र. २८ वरील सही साक्षीदाराची आहे. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदार यांनी उलटतपासादरम्यान उत्तर सूचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१२. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.५ नईम जहांगीर पठाण यांच्या

साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १०/०६/२०२३ रोजी काय झाले हे साक्षीदारास माहित नाही. दिनांक १०/०६/२०२३ रोजी आरोपी इब्राहिम शेख याने रियाज पठाण या साक्षीदाराच्या भाच्च्यास मी पत्रकार व आर.टी.आय अधिकारी आहे. तुझ्या बेकारीमध्ये भेसळ होते, तुझ्या बेकरीचा फोटो काढून पेपरमध्ये छापतो असे काही सांगितले नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सर्व उत्तर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१३. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.६ ऋषीकेश सुनिल साठे यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १०/०६/२०२३ रोजी काय झाले होते हे साक्षीदारास माहित नाही. त्यादिवशी ११:३० ते १२:०० वाजताच्या सुमारास साक्षीदारास रियाज पठाण व करण मोरे बिडवे ट्रॅव्हल्सच्या तिथे बोलत थांबले होते असे काही घडले नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. परंतु सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सर्व उत्तर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१४. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.७ करण सुरेश मोरे यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक ०६/१०/२०२३ रोजी काय झाले हे साक्षीदारास माहिती नाही. सदर दिवशी साक्षीदाराने बेकरी बंद केल्यानंतर साक्षीदार, रियाज, ऋषीकेश बिडवे ट्रॅव्हल्सच्या अलीकडे बोलत थांबले होते तेव्हा आरोपी इब्राहिम राजअहमद शेख तेथे आला असे काही घडले नाही. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी त्यांना देण्यात आली. परंतु सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सर्व उत्तर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१५. अभियोग पक्षातर्फे तपासी अधिकारी साक्षीदार क्र.८ मनोजकुमार पाषाण

भोसले यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १०/०६/२०२३ रोजी रियाज पठाण नावाच्या व्यक्तीने इब्राहिम राजअहमद शेख यांच्याविरुध्द खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. तो ठाणे अंमलदार कोळेकर यांनी दाखल करुन पुढील तपासासाठी सदर साक्षीदार यांच्याकडे दिला. साक्षीदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पोष्ट चौक ते नाळे प्लॉट असे होते. घटनास्थळाची दोन पंचांसमक्ष पाहणी केली आणि पंचनामा केला. दिनांक १०/०६/२०२३ रोजीच्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आरोपीचा शोध घेतला, साक्षीदाराची तपास टिपणे नोंदविली. आरोपीला अटक केली व दोन पंचांसमक्ष पोलीस कस्टडीदरम्यान आरोपीचा निवेदन पंचनामा नोंदविला. त्यानंतर आरोपीने वाहनामधून साक्षीदारास पंचांसह त्याच्या घरी नेले. आरोपीने घराच्या आतील खोलीमध्ये कोप–यात ठेवलेल्या प्रवासी बॅगमधून त्याने स्विकारुन ठेवलेल्या रक्कमेपैकी ४०००/– रुपये रोख रक्कम पंचांसमक्ष काढून घेवून सदर रक्कम जप्त केली व त्याचा जप्ती पंचनामा दोन पंचांसमक्ष करण्यात आला. साक्षीदार क्र.५,६ व ७ यांचे जाबजबाब त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविलेले होते.

१६. आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदार उलटतपासादरम्यान हे अमान्य केले आहे की, आरोपी दिनांक १०/०६/२०२३ रोजी बस स्टॅण्डवरील सी.सी.टिव्ही फुटेजमध्ये दिसत होता, आरोपीने बस स्टॅण्डची सी.सी. टी. व्ही फुटेज गोळा करण्याची साक्षीदारास विनंती केली, आरोपी भ्रष्टाचार उघड करतो म्हणून साक्षीदारा त्यांच्यावर चिडून होते त्यामुळे त्याला खोट्या अडकवलेले आहेत.

१७. अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. साक्षीदार क्र.१ आणि आरोपी यांच्यामध्ये आपसात तडजोड झाल्याचे दिसून येत आहे. तसेच इतर घटनास्थळ पंच व निवेदन तथा जप्ती पंच यांनी पंचनामे त्यांच्यासमोर झाल्याचे नाकारलेले आहेत. साक्षीदार क्र. ५, ६ व ७ यांनी घटनेबाबत काहीही माहिती नाही असे साक्षीपुराव्यादरम्यान कथन केलेले आहेत. तपासीक अंमलदार साक्षीदार क्र. ८ यांची साक्ष अभियोग पक्षाच्या हकीकतीस समर्पक अशी असली तरी आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होणेसाठी सदर साक्षीचा आधार घेणे याठिकाणी न्यायोचित ठरणारे नाहीत. साक्षीदार क्र. १ ते ८ यांच्या तोंडी साक्षीपुराव्याचे अवलोकन करता आरोपी याने दिनांक

१०/०६/२०२३ रोजी रात्री १२.३० ते ०१.०० वाजताचे दरम्यान बिडवे ट्रॅव्हल्सच्या अलीकडे, बार्शी, ता. बार्शी येथे आरोपी याने फिर्यादीस "इंडियन बेकरी अॅन्ड डेअरीमध्ये भेसळ चालते तुझी अन्न भेसळ व इतर विभागाकडे यांचेकडे तक्रार अर्ज व तक्रारी मेल करतो. मी पत्रकार व आरटीआय पदाधिकारी आहे. मला सर्व अधिकारी घाबरतात तुझी बेकरी बंद पाडायची नसेल तर तु मला आता १०,०००/– रुपये खंडणी दे नाही तर तुझी बेकरी बंद पडली म्हणून समज" अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांनी घाबरुन त्याचे जवळील ५०००/– रुपये आरोपीस दिले व उर्वरीत पैशासाठी आरोपीने फिर्यादीच्या घरी येवून पैसे दिले नाहीतर तुझ्या बेकरीचे फोटो पेपरमध्ये व फेसबुकवर टाकून बेकरी बंद करतो अशी धमकी दिली हे उपलब्ध पुराव्यांवरुन सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२साठी</u>**

१८.	गुन्ह्यात जप्त रोख रक्कम ५००/– दराच्या ८ नोटा एकूण रक्कम रु. ४०००/– यांची आजतागायत फिर्यादीने किंवा आरोपी तसेच इतर कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम अपील कालावधीनंतर सरकार जमा करणे न्यायोचित ठरणारे आहेत. फौजदारी प्रकरणांमध्ये आरोपीचा गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा निःसंशयपणे शाबीत करण्याकरिता सबळ पुरावा दिला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्ष आरोपी विरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी शाबीत करु शकले नाहीत. प्रस्तुत प्रकरणातील सर्व बाबी व परिस्थिती तसेच अभिलेखावरील पुरावा व मुद्यांवरील निष्कर्ष या सर्व बाबी लक्षात घेवून आरोपीस सदर गुन्हयातून निर्दोष सोडणे उचित राहिल. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१.	आरोपी इब्राहीम राजअहमद शेख, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३८४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२.	आरोपीने खटला प्रलंबित असताना दिलेले जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३.	आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रु. २५,०००/– चे

वैयक्तिक जातमुचलक्याची पूर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल रोख रक्कम ४०००/-( ५००/- रु दराच्या चलनी एकूण ८ नोटा त्यांचे नंबर 1) 4PD468161, 2) 8RQ801812, 3) 7NN249275, 4) 2MR676540, 5) 9BP373342, 6) 7KV545784, 7) 0AW009731 आणि 8) 0EW093066) अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी.

५. या न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादी यांना संबधीत जिल्हाधिकारी यांचे मार्फत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला.)

Sd/-

( जी. एस. पाटील )

दिनांक – १६/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी, जि. सोलापूर